## नेरुळ पोलीस ठाणे, परिमंडळ - १ वाशी नवी मुंबई

---

## घरफोडी करणाऱ्या दुकलीस नेरूळ पोलीस ठाणेकडुन अटक, ४ गुन्हयांची उकल करण्यात नेरूळ पोलीसांना यश

---

मा. पोलीस आयुक्त श्री. बिपिन कुमार सिंग यांचे आदेशाने मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुरेश मेंगडे, परि. १ वाशी, मा.सहा. पोलीस आयुक्त श्री भरत गाडे, तुर्भे विभाग व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शाम शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली नवी मुंबई हददीमध्ये वाढत्या घरफोडीच्या गुन्हयांस आळा घालण्यासाठी व आरोपीतांना पकडणेकरीता योग्य त्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने नेरूळ पो. ठाणेचे गुन्हे प्रकटीकरणाचे सपोनि श्री.सचिन मोरे, सपोनि श्री राजेंद्र घेवडेकर व गुन्हे प्रकटीकरण स्टाफ यांनी तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून मिळालेल्या माहितीवरून अश्या प्रकारचे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार हे कळवा, ठाणे परिसरामध्ये असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर परिसरामधून संशयित इसम नामे **१) महारूफ नासीर शेख, वय २३ वर्षे रा.इंदिरा नगर, महाकाली चौक, झोपडपट्टी कळवा, जिल्हा-ठाणे** व **२) युसुफ नुरइस्लाम शेख, वय- २५ वर्षे, रा. रूम नंबर १८९२, ख्वाजा गरीब नवाज चाळ, शांतीनगर, एकता झोपडपट्टी,कळवा (पुर्व) ठाणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कसोशीने तपास केला असता त्यांचा नेरूळ पोलीस ठाणे, गु.रजि.नं. २१५/२०२१ कलम ४५४,३८० भादंवि या गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना दिनांक ०१/०७/२०२१ व दिनांक ०३/०७/२०२१ रोजी नमुद गुन्हयात अटक केली.

सदर दोन्ही अटक आरोपींकडे सखोल, कौशल्यपुर्ण तपास करून त्यांच्याकडुन नेरूळ पोलीस ठाणेकडे दाखल गु.रजि.नं. १) २१५/२०२१ कलम ४५४,३८०,३४ भादंवि, २) ४२/२०२१ कलम ४५४,४५७,३८० भादंवि, ३) १७४/२०२१ कलम ४५४,४५७,३८० भादंवि व ४) १९३/२०२१ कलम ४५४,४५७,३८० भादंवि या गुन्हयांची उकल करण्यात पोलीसांना यश आलेले आहे. त्यांच्याकडुन अंदाजे १४७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे व चांदिचे दागिने किं. ६,१०,०००/-रू.चे असा गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर अटक आरोपी हे सराईत घरफोडी करणारे आहेत. अटक आरोपी **महारूफ नासीर शेख याच्याविरूध्द घरफोडीचे** १) कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे १ गुन्हा, २) सीबीडी पोलीस ठाणे येथे ५ गुन्हे, ३) महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे ५ गुन्हे नोंद आहेत. तसेच अटक आरोपी **युसुफ नुरइस्लाम शेख** याच्याविरूध्द घरफोडीचे १) सीबीडी पोलीस ठाणे येथे ५ गुन्हे, २) कळवा पोलीस ठाणे येथे ४ गुन्हे, ३) महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे ४ गुन्हे, ४) खडकपाडा पोलीस ठाणे येथे १ गुन्हा व ५) भायखळा पोलीस ठाणे, मुंबई येथे १ गुन्हा नोंद आहे. नेरूळ पोलीस ठाणेकडे दाखल गुन्हयांचा तपास करण्यात येत आहे.